महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका/न.क्र.०९
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmhrmsedcl@gmail.com
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. ०२२ - ६९४२५१४१

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ७०५ दिनांक ११ / ०२ / २०२६

**विषय: "वेल्हे" या तालुक्याच्या नावामध्ये "राजगड" असा केलेला बदल कंपनी अंतर्गत स्विकारण्याबाबत.**

**संदर्भ: शासन राजपत्र, महसूल व वन विभाग दि.२२.०८.२०२५.**

*****

महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार, असाधारण क्र.३०१, प्राधिकृत प्रकाशन, महसूल व वन विभाग दि.२२.०८.२०२५ (अधिसूचना क्र.प्राफ़ेब-२०२३/प्र.क्र.१०८/म-१० दि.२२.०८.२०२५) अन्वये "वेल्हे" या तालुक्याचे नाव बदलून ते "राजगड तालुका" असा बदल करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे अनुसूची पारित करण्यात आलेली आहे.

| (१) | (२) |
|---|---|
| वेल्हे तालुका | राजगड तालुका |

२. महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२२.०८.२०२५ अन्वये दिलेल्या अधिसूचनेच्या अनुषंगाने महावितरण कंपनीमधील सर्व स्तरांवर लेखी व तोंडी उपयोगात असलेल्या "वेल्हे" या तालुक्याच्या नावाचा उल्लेख वेल्हे तालुका ऐवजी राजगड तालुका असा बदल करण्यास सक्षम अधिकारी यांनी मंजूरी प्रदान केलेली आहे.

३. सबब, यापुढे कंपनीतील सर्व स्तरांवर, कंपनीच्या अभिलेखांमध्ये बदल करणेसाठी ज्या-ज्या ठिकाणी लेखी व तोंडी तसेच कंपनीच्या संकेतस्थळावर उपयोगात असलेल्या "वेल्हे" या तालुक्याचा उल्लेख "वेल्हे" तालुका या ऐवजी "राजगड" तालुका असा करण्यात यावा व सदरची बाब सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावी. तसेच कंपनीच्या संबंधीत भौगालिक क्षेत्रातील कार्यालयांच्या नावात व कार्यालयीन पत्त्यात तसा बदल सर्व स्तरावर करण्यात यावा.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**सोबत:-** शासन राजपत्र दि.२२.०८.२०२५.

**( भूषण कुलकर्णी )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(मासं)/(प्रकल्प)/(वाणिज्य) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (वित्त व लेखा)/(वितरण)/(पायाभूत आराखडा)/विशेष प्रकल्प)/(मासं)/(सुवअं) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण)/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/कंपनी सचिव, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु), म.रा.वि.वि.कं.मर्या., नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.(सांघिक कार्यालय/क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई.

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ११, अंक ११९] शुक्रवार, ऑगस्ट २२, २०२५/श्रावण ३१, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३०१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ ऑगस्ट २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.**

क्रमांक प्राफेब-२०२३/प्र.क्र.१०८/म-१०.— महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एकेचाळीस) चे कलम ४ च्या पोट-कलम (१) चे खंड (सहा) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, आणि उक्त कलम ४ च्या पोट-कलम (४) द्वारे आवश्यक केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन या प्रस्तावास पूर्वप्रसिद्धी दिल्यानंतर आणि प्रस्तावासंबंधीच्या हरकती व सूचना विचारात घेतल्यानंतर महाराष्ट्र शासन, याद्वारे सोबतच्या अनुसूचीच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या महसुली क्षेत्राच्या नावामध्ये बदल करीत आहे आणि उक्त अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्याला नवीन नाव देत आहे.

**अनुसूची**

| (१) | (२) |
|---|---|
| वेल्हे तालुका | राजगड तालुका |

२. कोणताही कायदा किंवा लेख किंवा इतर दस्तऐवज यामधील उक्त अनुसूचीच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या महसुली क्षेत्राचा (ही अधिसूचना प्रसिद्ध होण्याच्या लगतपूर्वी ते जसे अस्तित्वात असतील त्याप्रमाणे) कोणताही संदर्भ हा संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, उक्त अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये नवीन नाव दिलेल्या महसुली क्षेत्राचा संदर्भ असल्याचे समजण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अजित देशमुख,**
शासनाचे सहसचिव.

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, date 22nd August 2025.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

No. TLC 2023/CR 108/M-10.—In exercise of the powers conferred by clause (*vi*) of sub-section (1) of section 4 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah.XLI of 1966) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, after previous publication as required by sub-section *(4)* of the said section 4 and having considered the objections and suggestions thereto, hereby alters the name of the revenue area specified in column (1) of the Schedule appended hereunder and rename it as mentioned against in column (2) of the said Schedule.

*Schedule*

| (1) | (2) |
|---|---|
| Velhe Taluka | Rajgad Taluka |

2. Any reference, in any law, instrument or other document to the revenue area specified in column (1) of the Schedule aforesaid (as they existed, immediately before the publication of this notification in the *Official Gazette*) shall, unless the context requires otherwise, be deemed to be a reference to the revenue area as renamed in column (2) of the said Schedule.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

AJIT DESHMUKH,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.